एल.ए.आर. क्र.२१/२०१९ व
२६/२०१९
नि.क्र.११/ क (सोबत)

अर्जदारातर्फे साक्षीदार क्र.१

**<u>उलटतपास प्रतिवादीतर्फे वकील श्री. के.व्ही. पंढरीकर यांचेमार्फत शपथेवर सुरु.</u>**

१. मला सरकारकडून २००१ साली चार हजार रुपये मिळाले होते. हे म्हणणे खरे आहे की, सरकारने २००१ साली अवॉर्ड मंजूर केले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी जे खरेदीखत नि.क्र.२० व २१ दाखल केले आहे त्या खरेदीखतामध्ये नमूद केलेली मोबदल्याची रक्कम खरी आहे.

**प्रश्नः** शपथपत्रात सदर रक्कम चुकीचे आहे असे तुम्ही का नमूद केले आहे?
**उत्तरः** खरेदीखतात नमूद केलेली रक्कम बरोबर आहे.

माझी जमीन १९९९ साली संपादित झाली आहे. हे म्हणणे खरे आहे की, शासनाने २००१ साली अवॉर्ड केल्याचे मला २००१ सालीच माहिती झाली. शासनाने दिलेला मावेजा चुकीचा असून २६/८/२००४ रोजी डेप्युटी कलेक्टर यांच्या कार्यालयमध्ये रेफरन्स दाखल केला होता. हे म्हणणे खरे नाही की, शासनाकडून जास्तीचा मावेजा उचलण्यासाठी मी मुदतीनंतर खोटा अर्ज दाखल केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, खरेदीखत नि.क्र.२० व २१ मध्ये नमूद जमिनीलगत गावठाण आहे. माझी जमीन व गावठाणामध्ये अर्धा कि.मी. पेक्षा कमी अंतर आहे. मी गावनकाशा दाखल करु शकतो. १९९९ साली माझ्या जमिनीमध्ये विद्युत पुरवठा असल्याबाबत कागदोपत्री पुरावा मी दाखल करु शकतो. हे म्हणणे खरे नाही की, १९९९ साली मी कोणत्याही कारखान्याचा सभासद नव्हतो. मी १९९९ साली कारखान्याचा सभासद असल्याचा पुरावा दाखल करु शकतो. हे म्हणणे खरे नाही की, डावा कालवा झाल्यामुळे माझी जमीन बागायत झाली. पुर्वीपासूनच माझ्या जमिनीत विहीर आहे. १९९३-१९९९ पर्यंत आमच्या गावात कोणताही खरेदीखत झाला नाही, याबाबत मी काही सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या गावात जमिनीला भाव नाही व दाऊदने शासकीय योजनेसाठी त्याच्या जमिनीचे मुल्यांकन जास्त दाखवले आहे. १९९९ साली संपादीत झालेल्या जमिनीतून मला वार्षीक एक लाख रुपये उत्पन्न मिळत असल्याबाबत माझ्याकडे आडत्याच्या पावत्या नाहीत. १९९९ सालचा ७/१२ उतारा दाखल करु शकतो. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या ७/१२ उताऱ्यावर ऊस पिकाची नोंद नाही. साक्षीदार सांगतो की, सदर कालावधीत माझ्या उसाची नोंद कारखान्यात झाली आहे. १९९९ साली माझ्या जमीनीस पाच हजर गुंठे भाव होता याबाबतचा कागदोपत्री पुरावा मी दाखल करु शकत नाही. साक्षीदार सांगतो की, मी कधीही १ गुंठा जमीन विक्री केली नाही, त्यामुळे माझ्याकडे त्याबाबत पुरावा नाही. हे म्हणणे खरे नाही की, शासनाकडून मला जास्तीचा मावेजा मिळण्याकरीता मी खोटा अर्ज दाखल करुन खोटे शपथपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण. फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

Digitally signed by BHOSALE VRINDA DHANANJAY
Date: 2026.01.07 17:46:00 +0530

दि.०७/०१/२०२६

**(श्रीमती. व्ही. डी. भोसले)**
सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, निलंगा.